जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

रविवार दि.२१ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २४०१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीस उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# पंकजाताई मुंडे यांचा विजय निश्चित बीड जिल्ह्यातील गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणुक रिंगणात त्रिशंखू लढत होणार असून जिल्ह्यात त्रिमूर्ती उमेदवार आपापल्या पक्षाचे कार्य जनतेसमोर मांडत जोरदार प्रचार करत आहेत.पंकजाताई मुंडे या भारतीय जनता पक्षाच्या मोठया नेत्या आहेत बीड जिल्हा हा त्यांचा मोठा चाहता वर्ग अठरापगड जमातीचा जनसमुदाय त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे सध्याची परस्थिती पाहता ताई, भाऊ, राज्याचे कृषीमंत्री, धनंजय मुंडे यांचे पाठबळ हत्ती मस्तक समान आहे स्व, गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा वारसा महाराष्ट्रची रनराधिणी म्हणून सम्पूर्ण राज्यात ओळख निर्माण आहे ही बाब जिल्ह्यातील सर्व मतदाराना ओळख आहे मतदान करण्याचं आवाहन करत आहेत. तसंच काही बनावट व्हिडिओ क्लिप घटना बदलणार किंवा जातीयवादी भाजपा आहे व्हिडीओ क्लिप सोशल मीडियावर प्रसारित करत मतदारांना आश्वस्त करत आहेत. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई






मुंडे जोरदार प्रचार करताना दिसत आहेत. प्रचारादरम्यान बोलताना पंकजा मुंडे यांनी बीडवासीयांना आवाहन केलं. यूट्यूब उघडलं की पंकजा मुंडे पडणार असं येत आहे मला ही निवडणूक अवघड नाही. मला कुठलेही कपट कारस्थान न करता मतदान करा. मी जात कधीही काढणार नाही. ठिगळं लाऊन संसार करण्याची ताकत स्त्रीमध्ये असते. मी फेडणाऱ्या पैकी नाही, मी स्त्री आहे. मला शिवणं माहीत आहे. तुमचे मतदान हे मी कर्ज समजेन.त्यांची परत फेड जिल्ह्यातील विकास कामे करून व्याजासकट परत करेन, असं आवाहन पंकजा मुंडे यांनी बीडकरांना करत विजयाचा विश्वास व्यक्त करत आताची लोकसभा निवडणूक ही उज्वल भविष्याची आहे. शांत मनाने विचार करून मत द्या. विधानसभा निवडणूक पुढे आहे. ही निवडणूक संसदेची आहे. त्यामुळे विचारपूर्वक मतदान करा. आपल्या बीडमध्ये मी सर्वात मोठं कॅन्सर रुग्णालय उभं करणार आहे. मी आपल्या जिल्ह्यासाठी उद्योग आणणार आहे. लोकांचे प्रेम आणि विश्वास माझ्यावर आहे. सुरेश धस हे माझ्यासोबत सदैव आहेत. माझी एकट्याची लीड नव्हे तर सर्व मतदारांची लीड राहील. कलयुगात अस्त्र शस्त्र घेऊन पुढे चालावं लागेल. ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर आहे. माझा विजय निश्चित आहे, असा विश्वास पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

## अवकाळी पावसाची शक्यता कायम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**



ऐन उन्हाळ्यात राज्यात अवकाळी पावसाची शक्यता कायम आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी वारे, विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तर उर्वरित राज्यात मात्र उन्हाचा चटका कायम राहण्याची शक्यता आहे. राज्यात हवामानात बदल होत आहेत. अनेक ठिकाणी तापमानात देखील वाढ झाली आहे. अनेक जिल्ह्यांत पारा चाळीशीच्या पुढेच आहे.

दरम्यान, मराठवाडा आणि परिसरावर समुद्रसपाटीपासून ९०० मीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. त्यापासून कर्नाटक, दक्षिण तमिळनाडूपर्यंत वाऱ्यांचे प्रवाह खंडित झाल्याने कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. त्यामुळे राज्यात पावसाला पोषक हवामान तयार झाले आहे. आज मध्य महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, नाशिक, नगर, पुणे, सोलापूर, सांगलीमध्ये पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.तर मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेडसह विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांत वादळी वारे, विजांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच आज उर्वरित राज्यात ढगाळ हवामानासह उन्हाचा चटका, उकाडा कायम राहण्याची शक्यता आहे. तर शुक्रवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये मालेगाव येथे राज्यातील उच्चांकी ४३.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.दरम्यान, रविवारी देखील मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागात हलक्या पावसाचा अंदाज आहे. तर सोमवारी कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. तर मंगळवारीही राज्यात ठिकठिकाणी हलक्या सरी पडतील, असा अंदाज हवामान विभागाने दिला

## कंधार तालुक्यातील पशु पालकांनो सावधान...लम्पी येतोय..!


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील पशुपालकांनो सावधान....लम्पी येतोय..! मागील दीड ते दोन वर्षांपासून जनावरांतील लम्पी त्वचा रोग या विषाणूजन्य आजाराने राज्यातील तसेच देशातील हजारो जनावरांना लागणं झाली होती,

तर मोठ्या संख्येने जनावरे मृत्युमुखी देखील पडली होती,आपल्या जिल्ह्यातील व तालुक्यांत सुद्धा शेकडो जनावरे या आजाराने मृत्यू पावलेले होते,

मागील काही दिवसांमध्ये लम्पी त्वचा रोगांची आपल्या जिल्ह्यातील तसेच तालुक्यातील काही जनावरांना बाधा झाल्याचे निदर्शनास आले आहे,पर्यायाने आपल्या स्वतःच्या गोवंशीय जनावरांची गेल्या दोन वर्षांत केल्याप्रमाणेच विशेष काळजी घेण्याचे बहु-परिचित आपल्याला लम्पी त्वचारोग हा आजार विषाणूजन्य आजार असून बाह्यपरजीवी कीटक जसे की गोचीड,डास,गोमाशा इत्यादी पासून



पसरतो तसेच बाधित जनावरांपासून निरोगी जनावरांमध्ये पसरतो,या आजाराची लक्षणे म्हणजे जनावरांच्या अंगावर एक रुपयाच्या नाण्याच्या आकाराच्या गोलाकाराच्या गाठी येणे,पोळीला किंवा पायाला सूज येणे,ताप येणे इत्यादी लक्षणे दिसून येतात, तसेच आजाराच्या प्रतिबंध करण्यासाठी आपल्या पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये लस उपलब्ध झालेली आहे,तसेच कार्यक्षेत्रातील गावांमध्ये लसीकरण मोहीम सुरू झालेली आहे,करिता प्रत्येक पशुपालकांने आपल्या गोवंशी पशुचे १०० टक्के लसीकरण न चुकता करून घ्यावे, कार्यक्षेत्रातील एकही गोवंशी पशुधन लसीकरणा पासून वंचित राहणार नाही,याची प्रत्येक पशुपालकांनी काळजी घ्यावी,जेणेकरून गेल्या दोन वर्षांमध्ये ज्याप्रमाणे आपण या घातक आजारावर मात करू शकलो त्याचप्रमाणे याही वर्षी करता येईल व आपले पशुधन निरोगी ठेवता येईल.

**आवाहन नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्रीमती मिनल करनवाल,पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ.पडले राजकुमार,जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.बोधनकर भुपेंद्र,तालुका सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ.दिनेश महेर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.रामपुरे दिनेश यांनी केले आहे,**

**लम्पी आजाराला प्रतिबंध करण्यासाठी सर्वप्रथम बाह्य परिजीवांचा नायनाट करावा लागेल,यासाठी १ लिटर पाण्यामध्ये १० मिली नीम तेल,१० मिली करंज तेल १० ग्राम अंगाचे साबण या मिश्रणाचा वापर करता येईल,तसेच लिंबाच्या पालाचा उपयोग करता येईल,म्हणजे माझा गोठा स्वच्छ गोठा ही मोहीम पुन्हा एकदा प्रत्येक पशुपालकांनी राबवावी लागेल.**

## सत्यनिर्मिती महिला मंडळ उमरखेड १६ वे वर्धापन दिवस विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित करून साजरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

दि.२० आज रोजी महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्ह्यात असलेली सत्यनिर्मिती महिला मंडळ उमरखेड याचे १६ वें वर्धापन दिवस विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित करून साजरे करण्यात आले. सत्यानिर्मित महिला मंडळ भारत सरकार द्वारा मान्यता प्राप्त महिला संघटन असून मागील सोळा वर्षा पासून सतत महिलांचे हक्कअधिकार साठी संघर्ष करत आहे तथा महिलांवर होणारे अत्याचार विरुद्ध सतत लढा देण्याचे काम करत आहे समाजात महिलांना समान सन्मान मिळावे या करिता सतत शासन दरबारी निवेदने देत आहे देशात जतियसालोखा कायम रहावा या साठी देशात आणि विशेष महाराष्ट्र राज्यात रक्षा बंधन,हळद कुंकू,ईदे मिलाद,संविधान दिवस,सावित्रीबाई फुले जयंती,फातिमा शेख स्मृती दिवस,ईद मिलन अशे अनेक जातीय सलोखा कार्यक्रम सत्यानिर्मितीं महिला मंडळ राष्ट्रीय अध्यक्षा




सौ शबाना खान यांच्या मार्गदर्शनात महिला मंडळ विविध गावात आणि शहरात घेतात महिलांना सरसकट शिक्षण मोफत मिळावे या करिता बेटी पढाव भविष्य बचाव अशी वीणा अनुदानित योजना अभियान सुरू केले ज्या मुळे आज महाराष्ट्रात कित्येक गावी आठवी नंतर शिक्षण घेणारी विद्यार्थिनींनी लाभ घेताना दिसत आहे अशी निस्वार्थ संस्थेचे आज १६वे वर्धापन दीन असल्याने उमरखेड शहरात आज विविध सामजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले शाळेत जाऊन मुलींना सुरक्षा संबंधी विश्लेषण ग्रामीण रुग्णालयात जाऊन रुग्णांची विचारपूस आणि आरोग्य विषयी चर्चा आणि फळ वाटप आणि स्लम एरियात राहणारे गरीब निराधार महिलांना संसार उपयोगी वस्तू भेट दिले आणि एम के गार्डन मध्ये सर्व धर्म सामजिक एकता टिकून राहावी आणि जतीयसालोखा असेच कायम राहावे या करिता ईद मिलन कार्यक्रम घेऊन वर्धापन दिनाची सांगता करण्यात आली या वेळी कार्यक्रमात विधानसभेतील नामांकित व्यक्ती विशेष यांनी आपली उपस्थिती दिली प्रशासन उच्च अधिकारी आणि कर्मचारी यांनी ईद मिलन कार्यक्रमाचे आनंद घेतले निवडणूक असल्याने कोणतीही चार संहिता भंग होणार नाही याची सर्वेसर्वा काळजी घेऊन सदर कार्यक्रम जल्लोषात साजरा करण्यात आले या वेळी सत्यनिर्मिती महिला मंडळ राष्ट्रीय अध्यक्षा संस्थपिका विश्र्वशांतीदुत पुरस्कार सन्मानित नारी शक्ती राज्य सरकार पुरस्कृत सौ शबाना खान यांनी सर्व मान्यवरांचे मना पासून आभार व्यक्त केले तसेच पत्रकार बंधू यांनी या कार्यक्रमात येऊन उपस्थिती दर्शविली याचे अध्यक्षा यांनी आभार मानले सर्व कार्यक्रम वेळेवर यशस्वीरित्या पार पडले आणि सर्व महिला सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यास जी मेहनत घेतली त्याचे कौतुक सर्व प्रतिष्ठाने केले या वेळी सत्यनिर्मिती महिला मंडळ समिती डॉ वंदनाताई मरसुळकर,रेहाना शेख दादू,महेजबिन साजिद, सौ परवीन,सौ फर्झाना जावेद,सौ सविता निलेश पवार,सौ आनंदी पुरी,सौ तब्बसुम सय्यद,सौ रेहाना सिद्दी,सौ मिरा धाडे,सौ सविता भागवत,सौ कोमल शिलेश,सौ शांन्नो,सौ नसरीन बी व इतर सर्व महिला सदस्य तथा शेकडो च्य संख्येने नागरिक आणि महिला उपस्थित होत्या.

## बालाजी पेठकर यांची राष्ट्रवादीच्या जिल्हा चिटणीस पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, खासदार सुनिलजी तटकरे,प्रदेश अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या मान्यतेने जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा चिटणीस पदी बालाजी पेठकर यांची निवड झाली आहे.दि.१८ एप्रिल २०२४ रोज



गुरुवारी नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला, पेठकर हे कृषी विभागातील ट्रेसर (अनुरेखक ) संघटना नांदेड जिल्हाध्यक्ष पदी कार्यरत होते,तसेच केळी व लिंबोणी या फळपिकांसाठी,जिल्हा, राज्यस्तरावर विविध पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत,त्यांच्या निवडी बद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्य उपाध्यक्ष हरिराव भोसीकर,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्य सरचिटणीस भाऊसाहेब गोरठेकर,राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष ग्रामीण दक्षिण नांदेड माधवराव धर्माधिकारी,राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष कंधार मनोहर पाटील भोसीकर,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपजिल्हाध्यक्ष शिवकुमार भोसीकर, शिवदास धर्मापुरीकर, शंकरराव देशमुख,डॉ.दिनकर जायभाये,माधवराव मुंडे,भगवानराव किडे,यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत,निवडी बद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे,

## आयुष्याची खरी संपत्ती



लोकनेता न्युज नेटवर्क

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत असताना मोरे सर आम्हाला वर्ग शिक्षक होते तेव्हा आम्हाला सराव पेपर दिल्या जायचे, त्यापेपर वर पुढील आणि मागील पाने बोधकथा चारोळ्यानी गच्च भरलेली असायची... खर तर तो पेपर पूर्ण लिहावा इतके आम्ही कदाचित हुशार नव्हतो; परंतु पेपर वर छापून आलेले स्पष्ट वाचता येईल इतके नक्कीच हुशार होतो... त्यातील एका पेपर वर स्वामी विवेकानंदांच्या काही ओळी लिहिल्या होत्या.. की स्वतः साठी टुमदार घर हे तुमचे स्वप्न आहे. पण समोरच्या माणसाच्या मनात घर करायला शिका ते शिकलात तर..तुम्ही जाल तिथे घर तुमचे, आणि त्यातील माणसेही तुमचीच असतिल..आज या ओळींचा अर्थ आपल्या आयुष्यात उलगडताना दिसतो.



जात,धर्म,पंत या पलीकडे देखिल एक गोष्टी असते ती म्हणजे आपल्या विचारातून जोडलेली माणसं..विचार जुळून आले की क्रांती घडवून येतेच. आपल्या जगण्यात एक वेगळं पण असायलाच हवं. मी नेहमी म्हणत असतो की माणसं जोडणं हल्ली सोपं आहे हो... पण ती टिकवण खूप अवघड असतं.. प. पु. बाबांच्या आशीर्वादाने आम्हाला ती टिपण सोप जातंय. आणि आयुष्यभर आनंद देणारी माणसं भेटत राहो हीच सदिच्छा. आज गेवराई येथे गेलो असता दैनिक लोकनेता चे तालुका प्रतिनिधी ज्ञानेश्वर (माऊली) उदावंत यांची भेट झाली. योगा योग त्रिवेणी संगम ३ ज्ञानेश्वरांचा भेटण्याचा योग आला. या वेळी त्यांनी भेटी दरम्यान दोघांचा सत्कार केल्या त्या बद्दल त्यांचे मनस्वी धन्यवाद... आयुष्यात पैसे कमावता नाही आलीत तरी चालेल परंतु जीवाला जीव देणारी माणसं जोडता आली पाहिजे. हीच आपल्या आयुष्याची खरी संपत्ती. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क गेवराई)



**ओतूर येथील आरोग्यदीप हेल्थकेअर चे संस्थापक डॉ. विश्वास फापळे यांची कामा निमित्त ओतूर येथे भेट.. समवेत लोकनेता चे प्रतिनिधी मयूर ढोबळे व आदी. उपस्थित होते. (छाया. लोकनेता न्युज नेटवर्क)**

## चारोळी

उन्हाने झाली
साऱ्या जीवांची लाही लाही
वृक्ष लावून नटवूया धरत्रीला
ती प्रेमपान्हा निरंतर पाजत राही.

रंजना सानप
मायणी (सातारा)

संपादकीय

# मनोगताची मोदीशैली



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुलाखतीतून वर्तमानातील ज्वलंत समस्यांवर फारसा ऊहापोह झाला नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अखेर मुलाखत देण्यासाठी पुन्हा एकदा लोकसभा निवडणूक प्रचाराचा मुहूर्त निवडला. मोदी यांच्या संवादाबाबतच्या ज्या कल्पना आहेत; त्यात पत्रकार परिषदा, मुलाखती, खुली चर्चा यांना फारसे स्थान नाही. सभांचे फड ते गाजवतात, संसेदतही प्रभावी भाषणे करतात; परंतु प्रश्नोत्तरे, उत्तरावरील उपप्रश्न, त्यातून होणारे मंथन अशा प्रकारची चर्चा त्यांना रुचत नाही.

त्यामुळेच देशातील अनेक महत्त्वाच्या समस्यांवर विरोधकांनी उठविलेल्या मुद्द्यांबाबत सरकारतर्फे भूमिका स्पष्ट करण्यासाठी पुढे येऊन त्यांनी काही निवेदन केले, असे झालेले नाही. या पार्श्वभूमीवर 'एशियन न्यूज इंटरनॅशनल' (एएनआय) वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीकडे साहजिकच अपेक्षेने पाहिले गेले.

तिसऱ्यांदा सत्ता मिळविण्यासाठी मोदींच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्ष निवडणुकीला सामोरे जात असल्याने साहजिकच त्यांनी सरकारच्या दहा वर्षांच्या कामगिरीचा पाढा वाचला; विरोधकांना, त्यातही प्रामुख्याने काँग्रेसला टीकेचे लक्ष्य केले. सरकारवरील आरोप खोडून काढण्याचे प्रयत्न केले. निवडणूक रोख्यांच्या केंद्र सरकारच्या योजनेवर प्रचंड राळ उठली.

प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि अलीकडेच न्यायालयानेही या योजनेतील अपारदर्शी तरतुदींवर ताशेरे ओढत ती घटनाबाह्यच ठरवली. त्याविषयीच्या प्रश्नांवर मोदींनी सरकारची बाजू मांडली; पण त्यात वकिली युक्तिवादच जास्त होता. निवडणुकांसाठी राजकीय पक्षांना निधी मिळण्याची अधिकृत व्यवस्था नसेल तर भ्रष्टाचार फोफावतो, हे खरेच आहे.

पण त्यावर उपाय म्हणून निवडणूक रोख्यांची जी योजना सरकारने आणली, त्यात कोणत्या कंपनीने किंवा व्यक्तीने रोखे खरेदी केले आणि कोणत्या पक्षाला दिले आहेत, ही माहिती कळण्याची सोय नव्हती. त्यामुळेच या योजनेच्या विरोधात याचिका दाखल झाली आणि सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँकेला सर्व तपशील निवडणूक आयोगाला देण्याचा आणि आयोगाने तो जाहीर करण्याचा आदेश दिला होता.

मुलाखतीत हा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा ''जे व्यवहार एरवी बेहिशेबी पद्धतीने होते, ते या योजनेमुळे औपचारिक जाळ्यात आले,'' असे पंतप्रधानांनी सांगितले. ते खरेही आहे. पण मूळ आक्षेप तो नव्हताच. कोणी कोणाला दिले, ही माहिती का दडविण्यात येत आहे, हा सवाल होता. भ्रष्टाचार निर्मूलन आणि काळ्या पैशाच्या विरोधातील लढाई यशस्वी व्हायची असेल तर पारदर्शित्वाचा मार्गच स्वीकारायला हवा.

ज्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचा उपयोग भाजपलादेखील राजकीय मुसंडी मारण्यासाठी झाला, त्यातही हीच मागणी केली जात होती. मोदींनीही या मुलाखतीत मान्य केले की, ही योजना परिपूर्ण आणि निर्दोष आहे, असे नाही. याविषयी चर्चा होऊ शकते.

खरे तर २०१७मध्ये केंद्राने ही योजना मांडली, तेव्हाच त्यातल्या काही तरतुदींबाबत रिझर्व्ह बँक आणि निवडणूक आयोगाकडून काही हरकती घेण्यात आल्या होत्या. योजनेवर चर्चा होऊ शकते, असे पंतप्रधान आता म्हणताहेत. सर्वांगीण चर्चा त्याचवेळी झाली असती तर त्रुटीही त्याचवेळी दूर होऊ शकल्या असत्या.

मोदी २०१४ मध्ये स्पष्ट बहुमत मिळवून सत्तेवर आले, त्यात 'न्टिइन्कबन्सी' म्हणजेच 'प्रस्थापितविरोधी जनभावना' या घटकाचा फार मोठा वाटा होता. त्यानंतर दहा वर्षे सत्तेत राहिल्यानंतरही मोदी त्या घटकाचा अद्यापही उपयोग करू पाहात आहेत, हे मुलाखतीत दिसून आले. राममंदिराच्या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी सोमनाथ मंदिराच्या जिर्णोद्धाराची आठवण काढली.


काँग्रेस जनसामान्यांच्या धार्मिक भावना, श्रद्धेला किंमत देत नाही, हा मुद्दा ठसविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. खरे तर दक्षिणेकडील राज्यांत भाजपला मुख्य आव्हान आहे, ते प्रादेशिक पक्षांचे. परंतु द्रमुकचा विषय निघाला, तेव्हादेखील काँग्रेस पक्ष द्रमुकच्या आहारी जात आहे, यावरच त्यांनी जास्त भर दिला.

एकूणच त्यांची मुलाखत एकीकडे सहा-सात दशकांपूर्वीचा इतिहास आणि दुसरीकडे २०४७चा भविष्यकाळ अशा दोन ध्रुवांवर हिंदोळत होती. त्यात अगदी वर्तमानातील ज्वलंत समस्यांचा फारसा ऊहापोहच झाला नाही. बेरोजगारी, महागाई, चीनबरोबरचे तंटे आणि तणाव, शेतीतील अरिष्ट अशा जटिल प्रश्नांवर यावेळी चर्चा झाली नाही.

पंतप्रधानांनी घटना बदलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे स्पष्ट केले, हे बरे झाले; परंतु आपण विविध मतांचा आदर कसा करतो, हे सांगताना स्वयंसेवी संघटनांपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत अनेकांच्या विकसित भारताविषयीच्या कल्पना आपण कशा जाणून घेतल्या, याची माहिती त्यांनी दिली. हे अर्थातच चांगले आहे.

पण संसदीय लोकशाहीतील वाद-चर्चेच्या पारंपरिक व्यासपीठांनाही त्यांनी तेवढ्याच आस्थेने 'न्याय' दिला पाहिजे, ही त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त केली जाते, त्याचे काय, हा विषय अस्पर्शितच राहिला. 'मी कोणालाही घाबरवण्यासाठी निर्णय घेत नाही, तर देशाच्या सर्वसमावेशक विकासासाठी घेतो,' असे सांगून सर्वांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न मोदी यांनी केला खरा; पण निवडणूक रोख्यांची योजना रद्दबातल झाल्याने सर्वांनाच पश्चात्ताप होईल, हा त्यांचा इशारा मुलाखतीतील इतर प्रश्नांवर बोलताना जाणवलेल्या त्यांच्या आत्मविश्वासाशी विसंगत होता. त्यामुळेच मुलाखत प्रभावी आणि भावनांना हात घालणारी झाली असली तरी त्यातील बऱ्याच 'गाळलेल्या जागा' जास्त लक्ष वेधून घेणाऱ्या होत्या, हेही तितकेच खरे.

# उद्योजकीय गरजा आणि अभ्यासक्रम



कोणताही अभ्यासक्रम यशस्वी व्हायचा असेल, त्याची उपयुक्तता सिद्ध व्हायची असेल, तर तो कालसुसंगत आणि उद्योजकीय गरजांची पूर्तता करणाराच पाहिजे. नेमके त्याकडेच अभ्यासक्रम बनवताना दुर्लक्ष होते आहे.

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चर्चेत आल्यापासून अन् तत्पूर्वी देखील एक विषय सारखा चर्चेत असतो. आपले शाळा, महाविद्यालयातील अभ्यासक्रम कालबाह्य झाले आहेत. नोकरी देणारे उद्योजक तक्रार करतात की, आजचे पदवीधर नोकरीतल्या, उद्योगातल्या आजच्या गरजांसाठी उपयुक्त नाहीत. त्यांना नीट प्रशिक्षण मिळत नाही. आजकाल महाविद्यालय, विद्यापीठाचा दर्जा ठरविताना गुणवत्तेचा एक निकष किती विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाले, किती वार्षिक पॅकेज मिळाले, यावरून ठरतो. हा निकष योग्य आहे का? विद्यार्थ्यांना चांगली नोकरी मिळवून देणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे का? आपले अभ्यासक्रम उद्योजकांना विचारून ठरवायचे का? हा खरा प्रश्न आहे.

आपण हे योग्य आहे असे गृहीत धरले, तर आपण नेमक्या कोणत्या उद्योगासाठी पूरक शिक्षण घेतलेले (रेडिमेड) विद्यार्थी तयार करणे अपेक्षित आहे? वेगाने बदलणाऱ्या विज्ञान-तंत्रज्ञानमुळे उद्योग, सेवा क्षेत्र, कामाचे म्हणजे नोकरीचे स्वरूप आरपार बदलले आहे. ते बदलतच आहे. त्या वेगाने वरचेवर अभ्यासक्रम बदलणे, म्हणजेच परीक्षेचे स्वरूप बदलणे शक्य तरी आहे का?

आज अवती-भवतीच्या उद्योग क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता, त्यातील वैविध्य लक्षात घेता अभ्यासक्रम नेमका कोणत्या उद्योगाला पूरक ठरवायचा? टीसीएस, इन्फोसिस, गुगल, फेसबुक, एल अँड टी, डीआरडीओ, इस्रो, खासगी बँका, विमाकंपन्या, वित्तकंपन्या किंवा मार्केटिंग कंपन्या इत्यादी. या सर्वांच्या कामाचे स्वरूप सर्वथा भिन्न आहे. मग अभ्यासक्रम कोणाला अनुरूप ठरेल असा तयार करायचा?

दुसरे असे की, कोणती नोकरी स्वीकारायची याचे पूर्ण स्वातंत्र्य विद्यार्थ्याला आहे. ते महाविद्यालय किंवा विद्यापीठ ठरवत नाही. आपल्या असे लक्षात येईल की, ९० टक्के विद्यार्थी त्यांना जे शिकवले त्याचा शिक्षणेतर आयुष्यात मुळीच प्रत्यक्ष उपयोग करीत नाहीत. देशातल्या नाणावलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म्हणजेच 'आयआयटी'तून केमिकल इंजिनियरिंगची पदवी घेतलेला विद्यार्थी संगणक क्षेत्रात काम करतो.

मोठ्या कंपन्यांच्या उभारणीमध्ये योगदान देतो. अन् शेवटी हे सारे सोडून मराठीत मोठमोठे सुलभ ग्रंथ लिहितो! चेतन भगत मेकॅनिकल इंजिनिअर. पण त्याने काम केले ते परदेशी बँकेत. नंतर चक्क कादंबरी, चित्रपटलेखनाचे क्षेत्र निवडले.

'आयआयटी'तून शिक्षण घेतलेलेच काही विद्यार्थी चक्क आध्यात्मिक गुरू, व्यक्तिमत्व विकासाचे मार्गदर्शक झाले आहेत. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. महाविद्यालय सोडताच नोकरीत, व्यवहारात आपण जे काही ज्ञान, विज्ञान वापरतो ते सारे अभ्यासक्रमाबाहेरचे असते. मग उद्योगाच्या गरजा ओळखून अभ्यासक्रम तयार करा, हा अट्टाहास कशासाठी?

कोणत्याही विषयाचा अभ्यासक्रम सर्वंकष असावा लागतो. त्या-त्या विषयाबाबतच्या मूलभूत संकल्पना, त्याची व्यावहारिक उपयोगिता म्हणजेच पलिकेशन, व्यावहारिक उदाहरण, समस्यांचे आकलन, विश्लेषण, मिळून काम करण्याचे धोरण, नैतिक मूल्यांचे महत्त्व, स्वतंत्र, तार्किक विचार करण्याची पद्धत, क्षमता हे सारे शिकवायचे असते. प्रत्येक प्रश्नाचे एकच एक ठोकळेबाज उत्तर या भ्रमातून बाहेर पडून, एकापेक्षा जास्त उत्तरांची संभाव्यता तपासायची असते. त्या अनेक उत्तरातून सर्व दृष्टीने उत्तम, कमी खर्चिक, सोपे उत्तर कोणते, हा शोध व्यवहारात जास्त महत्त्वाचा असतो.

सातत्याने होणाऱ्या बदलांचा सामना करणे, ते बदल स्वीकारून, समजून, त्यानुसार आवश्यक नवे ज्ञान संपादन करणे (श्रशरीपळपस री ुशश्रश्र री पिश्रशरीपळपस) हे सारे गरजेचे असते. जेव्हा उद्योजक म्हणतात की, तुमचे अभ्यासक्रम कालबाह्य आहेत, तेव्हा त्यांना अभ्यासक्रमात, शिकवण्याच्या पद्धतीत बदल अपेक्षित आहेत, हे लक्षात घ्यावे.

अभ्यासक्रम तयार करताना काय, किती, कसे, केव्हा शिकवायचे, अन् शिकविले त्याचे उचित मूल्यमापन कसे करायचे यावर जास्त विचार व्हायला हवा. पूर्वी पाढे पाठ असण्याला महत्त्व होते. इतिहासातील सनावळ्यांना महत्त्व होते. गणितात लॉगटेबलचा वापर, त्रिकोणमिती आणि त्याचा वापर करून गणिते सोडवणे, गणितातील इतर संकल्पना समजून घेऊन त्यांचा वापर करणे याला महत्त्व होते. आता त्याच्या पलीकडे अन्य ज्ञानाचीदेखील गरज भासते.

समीकरणे सोडवायला संगणक आहेत. हव्या त्या माहितीसाठी इंटरनेट, गुगल आहेच. पूर्वी बँकेत पैसे जमा करणे, पैसे काढणे यासाठी रजिस्टर वापरायचे. आता सॉफ्टवेअर आले आहेत. त्यामुळे हे काम स्वतःचे स्वतः करता येते. एटीएमवर जाऊन पैसे काढता किंवा भरता येतात. त्याशिवायही तेथे इतर सुविधा उपलब्ध आहेत. बऱ्यापैकी व्यवहार ऑनलाईन होताहेत.

आपण पूर्वी जी गणिते सोडवण्यासाठी वेळ घालवीत होतो, ते काम आता संगणक करेल. हा फावला वेळ आपण दुसऱ्या अभ्यासासाठी वापरू शकतो. नवे वाचन करू शकतो. आता फळ्यावर प्रमेये सिद्ध करून दाखवण्याची गरज नाही. जे पुस्तकात आहे, तेच कशाला शिकवायचे? त्या ऐवजी त्या प्रमेयामागची संकल्पना, त्याचा व्यवहारात उपयोग कसा करायचा, हे सोदाहरण समजावून सांगा. ते जास्त फायद्याचे ठरेल.

अभ्यासक्रम हा शिक्षकाने केवळ मार्गदर्शक म्हणून वापरायचा असतो. तो अभ्यासक्रम किती रंजक, उपयोजित पद्धतीने शिकवायचा याचे पूर्ण स्वातंत्र्य शिक्षकाला असते. तथापि, आपण ते वापरत नाही. आपले शिकवणे आगळे वेगळे, 'आऊट ऑफ बॉक्स' व्हायला हवे. हा प्रयत्न प्रत्येक प्राध्यापकाने करायला हवा. त्यासाठी कष्ट घ्यावे लागतात. वेळ द्यावा लागतो. अभ्यासक्रमाच्या बाह्यरचनेपेक्षा शिकविण्याची-शिकण्याची पद्धत जास्त महत्त्वाची.

ती भविष्याचा वेध घेणारी, उद्याच्या गरजा ओळखून त्यानुसार सातत्याने बदलाला सामोरे जाणारी अशी हवी. आपल्या प्रयोगशाळांतून जे विज्ञानाचे प्रयोग शिकवतात ते जुने, वापरण्यात येणारी यंत्रे जुनी. आता अनेक क्षेत्रात स्वयंचलीतीकरण झाले आहे. वैद्यकीय क्षेत्रात आधुनिक दवाखान्यातील यंत्रणा पाहिली की हे लक्षात येते. इंटरनेटमुळे सेवा क्षेत्र पुरते बदलले आहे. हे बदल शिकण्यात, शिकविण्यात म्हणजेच अभ्यासक्रमात प्रतिबिंबित होणे गरजेचे आहे.

आपल्याकडील अभ्यासमंडळे, विद्वत परिषदा, सिनेट या प्राधिकरणांचे या महत्त्वपूर्ण बाबींकडे पुरते दुर्लक्ष होते. याचे कारण या सर्व क्षेत्रात प्रचंड प्रमाणात वैचारिक दारिद्र्य आहे. तिथे राजकीय घुसखोरी आहे. तिथला अजेंडा वेगळाच आहे. त्यामुळे रोग एकीकडे उपचार दुसरीकडे अशी अवस्था आहे.

विद्यापीठातील संशोधन, पीएच.डी.ची गरज, त्यातून वाढलेला भ्रष्टाचार यामुळे त्या पदवीची निरर्थकता लक्षात येते. त्यातील कमतरता दूर करण्याची गरज आहे. थोडक्यात, अभ्यासक्रमाकडे बघण्याचा सध्याचा दृष्टिकोन आधी बदलण्याची आवश्यकता आहे. त्यातील महत्त्वाचे बदल पूर्णपणे अंमलात कसे येतील, हे पाहायला हवे.

# संकल्प आणि गॅरंटी



जाहीरनामा प्रसिद्ध करणे हा निव्वळ उपचार झाला असला तरी शासनसंस्थेच्या कारभाराकडे दोन प्रमुख राष्ट्रीय पक्ष कोणत्या दृष्टीने पाहतात, याची झलक त्यातून पाहायला मिळते.

संसदीय लोकशाही असलेल्या देशांमध्ये राजकीय पक्ष निवडणुकीच्याआधी जाहीरनामे सादर करतात. जिंकल्यानंतर कायदे, नियम आणि धोरणांमध्ये कोणते बदल करणार यासंबंधातील काही गोष्टी त्यांत नमूद केलेल्या असतात. पक्षांची धोरणात्मक दिशाही त्यावरून ठरत असते. त्यामुळे निवडणूक जाहीरनाम्यांची चर्चा होते. मात्र आता तो निव्वळ उपचार झाला आहे.

गेल्या आठवड्यात काँग्रेस पक्षाने 'न्यायपत्र' म्हणून आपला ४६ पानांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्यानंतर रविवारी भारतीय जनता पक्षाने ७६ पानांचे संकल्पपत्र जाहीर केले. दोन प्रमुख राष्ट्रीय पक्ष शासनसंस्थेच्या कारभाराकडे कोणत्या दृष्टीने पाहतात, याची झलक त्यातून पाहायला मिळते. हा दृष्टिकोन प्रामुख्याने 'मायबाप सरकार'चा आहे. त्यात लोकांचे सरकारवरील अवलंबित्व अधोरेखित होते.

वंचित घटकांना मदत हा त्याचा एक ठळक भाग. पण वंचितताच नष्ट व्हावी, असे व्यापक उद्दिष्ट डोळ्यासमोर का नाही, असा प्रश्न उपस्थित होतो. नाही म्हणायला भाजपने 'विकसित' देशांच्या रांगेत जाण्याचे स्वप्न दाखवले आहे. पण ते सत्यात उतरण्यासाठी विविध घटकांपुढे कोणती कठीण आव्हाने आहेत, याचा तपशील त्यात नाही.

भाजपने २०१४मध्ये ऋसबका साथ सबका विकासऋअशी घोषणा देत ऋएक भारत श्रेष्ठ भारतऋ चा उद्घोष करीत जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. ऋसंकल्पित भारत- सशक्त भारतऋअशी घोषणा देत २०१९मध्ये ऋसंकल्पपत्रऋप्रसिद्ध करण्यात आले होते. आणि आता सुशासन व विकासाच्या दहा वर्षांचा गाजावाजा करीत ऋफिर एक बार मोदी सरकारऋअसा निर्धार करण्यात आला आहे.

दहा वर्षांच्या सत्तेमध्ये या पक्षाने विषयपत्रिकेवरील काही प्रमुख विषय मार्गी लावले आहेत. त्यामध्ये अयोध्येतील राममंदिराची उभारणी, जम्मू-काश्मिरमधील ३७० वे कलम हटवणे,तोंडी तलाकची प्रथा रद्द करणे, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा, आर्थिक मागासांसाठी दहा टक्के आरक्षण इत्यादी प्रमुख बाबींचा उल्लेख करावा लागेल.

भाजपने सवंग लोकप्रिय घोषणांपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला आहे, याची नोंद घ्यावी लागेल. प्रत्यक्ष सत्ता राबवल्यानंतर आलेले शहाणपण म्हणूनही त्याकडे पाहता येईल. याचे कारण सत्तेत नसताना केलेल्या सवंग घोषणा प्रत्यक्ष सत्ता राबवताना अडचणीच्या ठरत असतात. 'पंतप्रधान गरीब कल्याण योजने'अंतर्गत ८० कोटी जनतेला २०२० पासून 'मोफत धान्य योजना' केंद्र सरकार राबवत आहे.

ही योजना पुढेही सुरू ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. खरेतर लोकांचे जीवनमान उंचावून त्यांना मोफत धान्य योजनेपासून दूर करण्याचे कुणाही राजकीय पक्षाचे उद्दिष्ट असावयास हवे; परंतु इथे ते दिसत नाही. २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढल्याचा दावा संकल्पपत्रात करण्यात आला आहे, तरीसुद्धा मग अशा योजना का सुरू ठेवाव्या लागतात, याची चर्चा करणे आवश्यक आहे.

पण अशा प्रकारच्या खुल्या संवादाचा अवकाश मुळात आक्रसलेला असताना जाहीरनाम्याकडून काय अपेक्षा करणार? जाहीरनाम्याचा लेखी दस्तावेज आणि प्रमुख नेत्यांनी केलेल्या घोषणा यातही पुन्हा फरक असतो आणि जाहीर सभांतून केलेल्या घोषणा निवडणुकीत अधिक प्रभावी ठरत असतात.

नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, दरवर्षी दोन कोटी तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे, भ्रष्टाचार समूळ नष्ट करणे, देशाबाहेरील काळा पैसा परत आणणे आदी घोषणा २०१४ मध्ये केल्या होत्या. प्रचारात तेच प्रमुख मुद्दे होते. या सगळ्या घोषणांचे काय झाले, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये सन्मान निधी देऊन त्यांच्याकडून इतर करांच्या माध्यमातून अनेक पटींनी रक्कम वसूल केली जाते.

भ्रष्टाचार संपवण्याची घोषणा केली गेली; परंतु अन्य पक्षातील भ्रष्ट नेत्यांना आपल्या पक्षात प्रवेश देऊन पावन करून घेतले. यातून भ्रष्टाचारनिर्मूलन कसे होणार? नोटाबंदी, इलेक्टोरल बाँड, पीएम केअर योजना इत्यादीसंदर्भातील अनेक प्रश्नही अनुत्तरित आहेत. बेरोजगारी कमी करण्यासंदर्भात भाजपने जाहीरनाम्यात आश्वासने दिली आहेत; पण मग गेल्या दहा वर्षांत त्या दिशेने काय काम झाले, याचाही लेखाजोखा जनतेपुढे मांडायला हवा.

संसदेतील बहुमताच्या जोरावर सांस्कृतिक पातळीवरील आपली विषयपत्रिका रेटून नेण्याबाबत जेवढा आग्रह दाखवला जातो, तेवढा तो सर्वसामान्य माणसाच्या जगण्याशी संबंधित मूलभूत प्रश्नांबाबत दाखवला जाणार का, हा प्रश्न भाजपच्या बाबतीत आणि ज्या आर्थिक सवलतींच्या घोषणांचा काँग्रेसने पाऊस पाडला आहे, त्यांच्या पूर्ततेसाठी पैसा कोठून उभा करणार हा प्रश्न काँग्रेसच्या बाबतीत लोकांच्या मनात उपस्थित होणारच. त्याची उत्तरे जाहीरनाम्यातून मिळणार नाहीत; पण निदान पुढच्या काळात ती मिळावीत, अशी आशा बाळगणे एवढेच नागरिकांच्या हाती आहे.

# कोणतेही सर्व्हे आले तरी जनता आम्हाला निवडून दिल्याशिवाय राहणार नाही-सुजय विखे

**पारनेर** । प्रतिनिधी

भावनांशी खेळून मत मागणे आपल्याला जमत नाही.डॉक्टर या नात्याने रूग्णांना सेवा देतानाचे व्हिडीओ काढणे आपल्याला पसंत नाही.केलेल्या विकास कामांवर आपण मतदान मागत आहोत.कोणतेही सर्व्हे येवू द्यात,मात्र मला विजयी करण्याचा सर्व्हे गरीबांच्या मनात ठामपणे असल्याचा विश्वास महायुतीचे उमेदवार खा डॉ सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

पारनेर तालुक्यात आयोजित केलेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खा.विखे पाटील बोलत याप्रसंगी भाजपाचे तालुका अध्यक्ष राहुल शिंदे प्रा.विश्वनाथ कोरडे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रशांत गायकवाड, सोनाली चालके, बंडू रोहकले, बाबासाहेब खिलारी, सचिन वराळ, रवींद्र पूजारी, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.आपल्या भाषणात खा.विखे पाटील म्हणाले की,लोकसभा निवडणुक ही देशाची आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील दहा वर्षात केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा मांडून भारतीय जनता पक्ष मतदान मागत आहे.मागच्या पाच वर्षात केंद्र सरकारच्या माध्यमातून योजनाचा लाभ सामान्य माणसापर्यत पोहचवला.जे प्रामाणिकपणे केले तेच आपण लोकांमध्ये जावून सांगत आहोत.इतरांसारखी खोटी सहानुभूती आपल्याला मिळवायची नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कोव्हीड संकटात डॉक्टर नात्याने आपणही हजारो रुग्णांची सेवा केली.पण समोर रूग्ण मरणांशी झुंज देत असताना त्याच्यावर



उपचार करतानाचे व्हीडीओ टाकण्याचा मोह आपल्याला कधी झाला नाही आणि होणारही नाही असे सांगून डुप्लीकेट व्हिडीओ करून राजकारण करण्याची पध्दत आमची नाही.विखे पाटील परीवार लोकंमध्ये जावून काम करतो.या जिल्ह्यातील लोकांच्या सुख दुखात सहभागी होवून लोकांचे पाठबळ मिळवतो.प्रेमाच्या आणि जीवाभावाच्या लोकांमुळेच विखे परीवाराला राजकारणात अनेक वर्ष संधी मिळाली.त्यामुळे आमचा सर्वे लोकांच्या मनात आहे.कोणाचेही सर्वे येवू द्यात अहिल्यानगर मतदार संघातून महायुतीचाच विजय होणार आणि पारनेर तालुक्यातून सर्वाधिक मतांची आघाडी मिळणार असल्याचा दावा खा.सुजय विखे पाटील यांनी केला.खोट्या सहानुभूतीला यापुर्वी पारनेर तालुका फसला.आता पुन्हा ती चूक या तालुक्यातील जनता करणार नाही असा विश्वास व्यक्त करून या तालुक्यातील जनतेने आता विकास कामाची तुलना करण्याची गरज आहे.दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाला.काम कमी आणि व्हिडीओच जास्त आशी परिस्थिती तालुक्याची असल्याचा टोला लगावून पारनेर हा विचरांचा तालुका आहे. जनता सूज्ञ आहे.एकदा झालेली चूक पुन्हा होणार नाही असेही त्यांनी सांगितले. लोकसभेची निवडणूक देशाचे भवितव्य घडवविणारी आहे.तशीच पारनेर तालुक्याच्या भवितव्यासाठी महत्वपूर्ण आहे.या भागातील युवकांचे भविष्य आपल्याला घडवायचे आहे.समृध्द सुशिक्षित आणि सुरक्षित पारनेर करीता आपल्या सर्वाच्या सहकार्याने काम करायचे असल्याचे डॉ विखे पाटील म्हणाले.

# मनपा शाळेत गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणार-आयुक्त जी श्रीकांत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**



छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सर्व ५७ प्राथमिक शाळेत आज शाळा पूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.या मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी मनपा के प्रा शाळा नारेगाव येथे मा.आयुक्त जी श्रीकांत यांनी बालवाडी मधील इयत्ता पहिली मध्ये प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा प्रवेश करून शुभारंभ केला. त्या प्रसंगी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करताना आयुक्त म्हणाले की यावर्षी महानगरपालिकेच्या शाळेत आम्ही सर्व भौतिक सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुढच्या वर्षी महानगरपालिकेच्या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबाबत नियोजन करण्यात आलेले आहे. मनपा शाळेत सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना लवकर शाळेत प्रवेश देऊन आपला प्रवेश निश्चित करावा विशेष करून माता पालकांनी आपल्या पाल्याकडे विशेष लक्ष द्यावे आणि त्याची शाळा पूर्वतयारी करून घ्यावी . सीबीएससी पॅटर्न शिकविणारे शिक्षकांना सुद्धा सेमी इंग्रजी माध्यम शिकविण्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. आणि सीबीएसई साठी वेगळे शिक्षक नेमलेले आहेत. जेणेकरून महानगरपालिका शाळेत इंग्रजी माध्यमाचे ही शिक्षण पुरेशा प्रमाणात मिळेल आणि भविष्यात विद्यार्थी मराठी /उर्दू सह इंग्रजी मध्येही तो यशस्वी होईल. त्यासाठी आपला प्रवेश लवकर करून घ्यावा त्या साठी शाळा उघडण्याची वाट पाहू नये असे ते म्हणाले . आज मेळाव्यात नारेगाव मराठी व उर्दू शाळेमध्ये १८९ विद्यार्थ्यांचा इयत्ता पहिली मध्ये प्रवेश झाला असून सर्व मनपा शाळेत ९२० विद्यार्थ्यांचा इयत्ता पहिली मध्ये पहिल्याच मेळाव्यात प्रवेश निश्चित झालेला आहे.या प्रसंगी मा.उप आयुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे ,शिक्षण अधिकारी भरत तीनगोटे ,कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे ,मुख्याध्यापिका संगीता ताजवे,मुख्याध्यापक अब्रार अहमद ,व सर्व शिक्षक तसेच बहुसंख्येने पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. किराड पुरा क्रं ०१ या शाळेत मुख्याध्यापिका रईसा बेगम यांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी हॉर्स रायडिंग आयोजित करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत केला. या मेळाव्यासाठी पालक अधिकारी म्हणून मा.अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, मनपा के प्रा शाळा इंदिरानगर बायजी पुरा, अतिरिक्त आयुक्त संतोष वाहूळे मनपा के प्रा शा बन्सीलाल नगर,शहर अभियंता ए बी देशमुख मनपा के. प्रा. शा. बनेवाडी ,उप आयुक्त अपर्णा थेटे मनपा के. प्रा. जुबली पार्क या शाळेला, उप आयुक्त राहुल सूर्यवंशी मनपा के प्रा शा कीराडपुरा नंबर एक ,उप आयुक्त सविता सोनवणे मनपा के प्रा शाळा हर्सूल , व आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ पारस मंडलेचा मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा प्रियदर्शनी नगर या शाळेच्या शाळा पूर्वतयारी मेळाव्यास उपस्थित होते. अशी माहिती शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

# ज्यांना अटक होण्यापासून वाचवले तेच आज विरोधात-नितीन गडकरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**




अनेक काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते माझ्याकडे त्यांच्या कामासाठी आले आहेत परंतु ते आज माझ्या विरोधात प्रचार करत आहे. एक तर जे तुरुंगात जाण्याच्या स्थितीत होते आणि त्यांना अटक होण्यापासून मी वाचवले होते. ते सुद्धा आज विरोधात प्रचार करत आहे. मात्र, याबद्दल माझा कुठलाही आक्षेप नसल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

नागपूर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार नितीन गडकरी यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत वचननामा ते वचनपूर्ती हा जाहीरनामा जाहीर केला, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या दहा वर्षात नागपूर शहरात केलेली विकास कामे आणि पुढील पाच वर्षात शहराच्या विकासासाठी कुठली विकास कामे केली जाणार आहे याचा आलेख मांडताना गडकरी म्हणाले, गेल्या पंधरा वीस दिवसांपासून शहरातील विविध भागात प्रचार सुरू असताना लोकांचा प्रतिसाद मिळतो. मात्र, माझ्यासोबत काम करणारे किंवा ज्यांना मी अनेक कामात मदत केली आहे असे अनेक काँग्रेसचे कार्यकर्ते व नेते माझ्या विरोधात प्रचार करत आहे.शहरात दोन तीन दिवसापूर्वी एक पदाधिकारी विरोधात फिरत होते, जे तुरुंगात जाण्याच्या स्थितीत होते. त्यांना अटक होण्यापासून मी वाचवले आहे. मात्र, ते आज विरोधात प्रचार करत आहे. त्याला माझा काही आक्षेप नसून मी विरोधात असलेल्यांची काम केली आहे. मी कधीही जातीभेद किंवा पक्ष क्षेद केला नाही. जो माझ्याकडे आला आहे त्याचे काम केले, असेही गडकरी म्हणाले.

# कुठे ऊन तर कुठे पाऊस:मराठवाडा, विदर्भात अवकाळी पावसाची शक्यता

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**



ऐन उन्हाळ्यात राज्यात अवकाळीचा तडाखा पाहायला मिळत आहे. आता आणखी चार दिवस विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यातच दुसरीकडे कोकण, ठाणे, मुंबईत उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यात कुठे ऊन तर कुठे पाऊस अशी स्थिती पाहायला मिळणार आहे.

राज्यातील कमाल आणि किमान तापमानात देखील मोठी वाढ झाली आहे. ठाणे जिल्ह्यात सोमवारी विक्रमी तापमान नोंदवले गेले आहे. तर मंगळवारी उत्तर कोकणातील ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यात उष्ण लाटेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याचा सल्ला हवामान खात्याने दिला आहे.दरम्यान, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये आजही पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर गुजरात आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती अद्याप कायम असल्याने वातावरणात सातत्याने बदल होत आहेत. उत्तर ओडिशापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे.मंगळवारी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेडमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तेसच मध्य महाराष्ट्रातील नगर, पुणे,सांगली, सोलापूरमध्ये हलक्या पावसाचा अंदाज आहे. तर उद्या बुधवारी सांगली, सोलापूर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.

# शिंदे गट विदर्भातील सर्व जागा जिंकणार-उदय सामंत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**



शिवसेनेच्या शिंदे गटाचे कोकणातील नेते व मंत्री उदय सामंत यांनी पक्षाच्या वाट्याला आलेल्या विदर्भातील रामटेक, यवतमाळ-वाशीम आणि बुलढाणा लोकसभा मतदारसंघावर लक्ष केंद्रीत केले आहे. प्रचाराच्या निमित्ताने ते वेळोवेळी नागपूरसह विदर्भाच्या विविध भागात जातात. त्यांनी शिंदे गट विदर्भातील लोकसभेच्या तीनही जागा जिंकेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

मंगळवारी ते नागपूरला आले असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, विदर्भात शिंदे गट लोकसभेच्या तीनही जागा मोठ्या मताधिक्याने जिंकेल. भावना गवळी नाराज नाही, त्यां पक्षाच्या प्रचारात सहभागी झाल्या आहेत. सामंत म्हणाले , महायुतीत नाराजी नाही. महायुतीचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी सक्षम हैं. पक्ष फोडणे, ब्लैकमेल करणे हे आमचे काम नव्हे. उपमुखयमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपाचे कार्यकर्ते महायुतीच्या उमेदवाराचे काम करीत आहे, मुख्यमंत्री शिंदे के नेतृत्व में शिवसेना पूर्ण क्षमतेने प्रचारात उतरली आहे. त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे.

पूर्व विदर्भात रामटेकमध्ये पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला मतदान आहे. दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीत यवतमाळ-वाशीम आणि बुलढाणा या शिंदे गटाचे उमेदवार असलेल्या मतदारसंघात निवडणूक आहे. पहिल्या टप्प्यातील प्रचार उद्या संपणार आहे. रामटेकमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभा घेतली. मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दोन सभा आहेत. शिंदे गटाने अभिनेता गोविंदालाही या मतदारसंघात आणले होते. येथे शिंदे गटाचे राजू पारवे व काँग्रेसचे शामकुमार बर्वे यांच्यात थेट लढत आहेत. रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र रद्द झाल्याने त्यांची उमेदवारी बाद झाली. मात्र या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. मात्र निवडणूक प्रक्रिया पुढे गेल्याने त्यांना निवडणूक लढता आली नाही. सरकारच्या दबावात बर्वे यांचे प्रमाणपत्र रद्द करण्यात आले, असा आरोप काँग्रेसकडून केला जात आहे.

# महापारेषणची टॉवर लाइनची वीजवाहिनी तुटली

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

महापारेषण कंपनीच्या २२० केव्ही टॉवर लाइनची दोनपैकी एक वीजवाहिनी तुटल्याने पिरंगुट २२० केव्ही व हिंजवडी २२० केव्ही उपकेंद्रांचा व पर्यायाने महावितरणच्या २० वाहिन्यांचा वीजपुरवठा मंगळवारी सकाळी बंद पडला. परिणामी भुकूम, भूगाव, पिरंगुट, कोळवण खोरे, मुठा खोरे आदी मुळशी तालुक्यातील परिसरातील ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद आहे. दुपारी ४ वाजेपर्यंत दुरुस्ती काम पूर्ण होईल. त्यानंतर वीजपुरवठा पूर्ववत होणार असल्याची माहिती महापारेषणकडून देण्यात आली.

याबाबत माहिती अशी की, कोकणातील रोहा येथून महापारेषणच्या कांदळगाव २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रातून टॉवर लाइनद्वारे पिंरगुट व हिंजवडी येथील महापारेषणच्या २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्राला वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र कांदळगाव २२० केव्ही टॉवर लाइनची एक वीजवाहिनी आंबेगाव (ता. मुळशी) येथे मंगळवारी (दि. १६) सकाळी सव्वा ९ वाजताच्या सुमारास तुटली. त्यामुळे पिंरगुट व हिंजवडी अतिउच्चदाब उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद पडला. तर या उपकेंद्रांवर अवलंबून असलेल्या महावितरणच्या सुमारे २० वीज वाहिन्यांचा वीजपुरवठा देखील खंडित झाला. त्यामुळे मुळशी तालुक्यातील भूगाव, भूकूम पिरंगूट, बुरावडे, कोळवण खोरे, मुठा खोरे, पौड, माले, माण, मारूंजी, कासारसाई, नेरे, दत्तवाडी, हिंजवडीचा काही भागासह ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे.महापारेषणची अतिउच्चदाब वीजवाहिनी तुटल्याने ७० मेगावॅट विजेची पारेषण तूट निर्माण झाली आहे. मात्र तापलेल्या उन्हामुळे विजेची मागणी वाढत आहे. त्यात ७० मेगावॅट विजेचे भारव्यवस्थापन करून पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे.

# गझल अभ्यासक डॉ.अविनाश सांगोलेकर यांची चैतन्य हास्य क्लबला सदिच्छा भेट



लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

मूळ सांगोलयचे भुमिपुत्र व सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेले गझल साहित्याचे अभ्यासक डॉ.अविनाश सांगोलेकर यानी नुकतीच चैतन्य हास्य क्लबला भेट दिली.त्यानी योग,प्राणायाम यात भाग घेतला.सर्वांच्या आग्रहास्तव त्यानी त्यांचा जीवन प्रवास व साहित्यिक प्रवास विषद केला.सर्वाच्या आग्रहास्तव त्यानी गझल मधील विनोदी प्रकार हझल याची माहिती देवून एक विनोदी गझल सादर केली.ते सान्गोल विद्यमन्दिरचे १९७४ चे एस.एस.सी.उत्तीर्ण विद्यार्थी असुन स्नेहमेळाव्यासाठी सान्गोला आले होते.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मधील मराठी विभाग प्रमुख म्हणून ते सेवानिवृत्त झाले असुन गझल विषयात त्यानी पी.एच.डी.मिळवली आहे.प्रा.राजाभाऊ ठोंबरे यानी आभार मानताना पुणे विद्यापिठातील त्यांच्या व डॉ.अविनाश यांच्या मैत्रीतील काही आठवणीना उजाळा दिला.तसेच या निमित्ताने डॉ अविनाश यांचे बंधू डौ.अनिल कांबळे,डॉ.कृष्णा इन्गोले यांची एकत्रित भेट झाल्याब्द्दूल आनंद व्यक्त केला.या वेळी चैतन्य हास्य क्लब अध्यक्ष जगताप सर, ह भ प बाळासाहेब तेली,हेमंत तेली जयंत तेली, म.शं घोंगडे,प्रकाश होनराव,सुधाकर म्हेत्रे,अशोक केदार,अशोक जाधव ,भागवत पैलवान,उत्तम पाटोळे,मिलिंद पतन्गे सूभाष महिमकर भाऊसाहेब पवार,आदि उपस्थित होते

# पिलीव येथील सोमनाथ बुगड गुरुजी यांचे मरणोत्तर नेत्रदान


लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**



जि. प. प्रा. शाळा जरगवस्ती (पिलीव) येथील आदर्श शिक्षक व पिलीव गावचे रहिवासी श्री. सोमनाथ अरुण बुगड ( वय ४७) यांचे १६ एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार नातेवाईकांनी त्यांचे मरणोत्तर नेत्रदान केले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली, दोन बंधु, वहिनी, पुतणे असा परिवार आहे. ते अतिशय मनमिळाऊ, हुशार व उत्कृष्ट शिक्षक होते. आपल्या कार्यकाळात आपल्या प्रभावी अध्यापनाने त्यांनी अनेक आदर्श विद्यार्थी घडवले. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांना शैक्षणिक कार्याबरोबरच शेतीची विशेष आवड होती.मरणोत्तर नेत्रदानासाठी आपुलकी प्रतिष्ठान सांगोला यांचे सहकार्य लाभले व अकलूज येथील डॉ. महाडिक व डॉ. गिरीश आर्वे यांनी नेत्रदानास मदत केली.

### आपुलकीच्या चळवळीला प्रतिसाद



सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठान गेले पाच वर्षापासून नेत्रदान, देहदान व अवयवदान चळवळ राबवत असून आतापर्यंत तीन व्यक्तींनी नेत्रदान करून आपुलकीच्या या चळवळीला प्रतिसाद दिला आहे. मरणोत्तर नेत्रदानाने दोन अंधांना दृष्टी मिळण्यास मदत होते, तेव्हा मरणोत्तर नेत्रदानासाठी आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला यांचेशी ( ९०११७०७०८० ) संपर्क साधावा

**– राजेंद्र यादव, अध्यक्ष, आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला.**

# ग्रामिण रोजगार हमी योजनेतील विहिरीचे खोदकामे जेसीबी यंत्राच्या साह्याने होत असल्याने रोजगारावर उपासमारीची वेळ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालूक्यातील मौजे मानोली येथे मानोली ग्राम पंचायतीचे सरपंच व रोजगार सेवक यांच्या संगणमताने विहिरीचे यंत्राच्या साह्याने खोदकामे करण्यात येत असून त्यामूळे कामगारावर उपारमारीचे संकट ओढावले असल्याची तक्रार गावातील नागरीकांनी मानवत पंचायत समितीच गटविकास अधिकारी यांच्याकडे एका निवेदना द्वारे करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे की,राज्यशासनाने मागेल त्याला विहिर दिली असून त्यामूळे ग्रामिण रोजणदारी कामगारांना काम मिळून त्यांचा रोजगाराचा प्रश्न मिटेल असे असतांनाही मानोली येथे ग्राम रोजगार सेवक व सरपंच यांच्या मनमानी व संगणमताने मजूरा ऐवजी यंत्राने विहिरीचे खोदकामे करण्यात येत असल्याची तक्रार गटविकास अधिकारी यांच्याकडे नागरीकांनी केल्याने खळबळ ऊडाली.

म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत विहिर खोदकामास मजुरांच्या सहाय्याने न करता जेसीबीने करत असले मूळे मजूरावर उपासमारीची वेळ आली असल्याची तक्रार संतोष सदाशिव शिंदे, सुरेश बालासाहेब मांडे मानोली येथील रहिवाशी असून मौजे मानोली येथील ग्रामरोजगार सेवक व सरंपच व काही एजंट हे एकमेकांशी संगणमत करुन मजुरांच्या सहाव्याने विहिरीचे खोदकाम न करता शेतक-यांकडून अतिरीक्त पैसे घेवून जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम करीत आहे. त्यामुळे मजुरांच्या हाताला काम मिळत नसल्यामुळे, मजुरांवर उपासमारीची वेळ येत आहे. तसेच काही वयोवृध्द मजुरांची देखील नावे लेबरकार्ड मध्ये टाकण्यात आलेलीआहेत. येथील ग्रामरोजगार सेवक, सरपंच व काही एजंट यांची चौकशी करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी व मजुरांना रोजगार मिळवून देण्यात यावा ही नम्र विनंती. अन्यथा आपल्या कार्यालया समोर दिनांक ०२/०५/२०२४ रोजी आत्मदहन आंदोलन करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी व होणा-या सर्व परिणामाची संपुर्ण जबाबदारी आपल्या लोक कल्याणकारी पंचायत समिती प्रशासनावर राहिल. असा ईशारा दिलेल्या निवेदनाद्वारे संतोष सदाशिव शिंदे, सुरेश बाळासाहेब मांडे यांनी प्रशासनाला दिला आहे.

# धनगरवाडी डोईठाण येथे संगीत रामकथेस प्रारंभ

## तरुणांनो व्यसनापासून दूर राहा-ह.भ.प सोपान महाराज शास्त्री

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**





आष्टी तालुक्यातील नागतळा येथील गणेशगड व नागनाथ संस्थानचे महंत काशीनाथ महाराज यांच्या १२ व्या.नारळी सप्ताहास धनगरवाडी डोईठाण येथे प्रारंभ झालेला आहे. या सप्ताहात संत मदन महाराज संस्थानचे अध्यक्ष रामायणाचार्य ह.भ.प.बबन महाराज यांची संगीत रामकथा सुरु आहे. साधु संतांच्या आशीर्वादाने आणि महंत काशीनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली धनगरवाडी येथे दि.१७ ते दि.२४ एप्रिल २०२४ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरु आहे.सप्ताहात टाळ,विणा, पखवाज,ग्रंथ पुजन झाले आहे. या सप्ताहात काकडाभजन, प्रवचन,विष्णु सहस्रनाम,गाथा भजन, दररोज दुपारी २ ते ५ पर्यत ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांची सुश्राव्य संगीत रामायण कथा, हरिपाठ, हरिकीर्तन होत आहे.

या सप्ताहात पहिल्या दिवशी ह.भ.प.अशोक महाराज शास्त्री(हातोला),दुसऱ्या दिवशी ह.भ.प.दयानंद महाराज कोरेगावकर, तिसऱ्या दिवशी कीर्तनाची सेवा ह.भ.प.सोपान महाराज सानप ( भागवतचार्य हिंगोली) यांचे हरिकीर्तन झाले. ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज तांबे (बुलढाणा),ह.भ.प.सागर महाराजा बोराटे (नातेपुते), सोमवार दि.२२ एप्रिल रोजी रात्री अ.भा.वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांचे हरिकीर्तन होणार आहे.

ह.भ.प.प्रा.विजय महाराज राजपुरे (सर) (धनगरवाडी) यांचे प्रवचन, ह.भ.प.अशोक महाराज शास्त्री (गोविंदगड,हातोला) यांचे हरिकीर्तन,ह.भ.प.वशीष्ट महाराज तरटे (सर) (जय हरी प्रतिष्ठाण,डोईठाण) यांचे प्रवचन,ह.भ.प.दयानंद महाराज कोरेगावकर (कोरेगाव) कर्जत यांचे हरिकीर्तन,ह.भ.प.हरी महाराज शास्त्री ऋषीकेश (कारखेल बु.) यांचे प्रवचन, ह.भ.प. सोपान महाराज सानप (भागवताचार्य,हिंगोली) यांचे हरिकीर्तन,ह.भ.प. विश्वनाथ महाराज ननवरे रामायणाचार्य, अरणगांव यांचे प्रवचन तर ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे (बुलढाणा) यांचे हरिकीर्तन झाले.आज रविवारी ह.भ.प. चैतन्य महाराज कुंभार (गहिनीनाथगड) यांचे प्रवचन, ह.भ.प. सागर महाराज बोराटे (नातेपुते) यांचे हरिकीर्तन होणार आहे.सोमवार दि.२२ एप्रिल रोजी ह.भ.प. बाबासाहेब महाराज महापुरे (जय हरी प्रतिष्ठाण,अहमदनगर) यांचे प्रवचन तर ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले (अखिल भारतीय वारकरी मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांचे हरिकीर्तन होणार आहे,मंगळवार दि.२३ एप्रिल रोजी ह.भ.प. सुदर्शन मुनी महाराज उदासीन (श्री क्षेत्र सुदर्शन आश्रम, शिदेवाडी) यांचे प्रवचन तर ह.भ.प.मंगेश महाराज वराडे (बुलढाणा) यांचे हरिकीर्तन .बुधवार दि. २४ एप्रिल रोजी नागतळा येथील श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान व गणेशगड संस्थानचे अध्यक्ष महंत काशीनाथ महाराज यांचे काल्याचे कीर्तन सकाळी १० ते १२ यावेळेत होणार आहे. नंतर महाप्रसाद होईल. भागवतचार्य ह.भ.प सोपान महाराज यांच्या कीर्तनाच्या वेळी पंचक्रोशीतील , सामाजिक धार्मिक,शैक्षणिक क्षेत्रातील भाविक भक्त, महिला,पुरुष, बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष दिनकरराव देशमुख यांचा शिवसेना(उ.बा.ठा)पक्षात प्रवेश

### हिंगोली विधानसभा मतदारसंघात भाजपाला धक्का



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी सभापती दिनकरराव देशमुख यांनी आज दि.२० एप्रिल शनिवार रोजी वसमत येथे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते आंबादास दानवे व हिंगोली संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांच्या हस्ते जाहीर प्रवेश केल्याने भाजपला हिंगोली विधानसभेत मोठा धक्का बसल्याचे दिसत आहे.दि.२४ एप्रिल रोजी पक्षप्रमुख उध्दवजी ठाकरे यांच्या हदगाव येथील विराट प्रचार सभेत देशमुख यांच्या असंख्य समर्थकासह भाजपा पदाधिकारीऱ्यांचा जाहीर प्रवेश होणार असल्याची माहिती आहे.

भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी सभापती दिनकरराव देशमुख यांनी ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आपल्या समर्थकासह शिवसेना(उ.बा.ठा)पक्षात शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते आंबादास दानवे व हिंगोली जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रवेश केल्याने महाविकास आघाडीचे उमेदवार नागेश पाटील आष्टीकर यांना हिंगोली विधानसभेत मोठे मताधिक्य मिळेल असे राजकीय वर्तुळातुन बोलल्या जात आहे.दिनकरराव देशमुख यांनी शिवसेनेत अनेक पदावर काम केले असुन हिंगोली विधानसभा मतदारसंघात दांडगा जनसंपर्क असल्याने व वेळोवेळी शिवसेनेत शेतकरी,शेतमजुर,सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी आंदोलने करुन न्याय देऊन शिवसेना पक्ष वाढीसाठी अहोरात्र प्रयत्न केले होते.देशमुख हे स्वगृही परतल्याने शिवसैनिकामध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे दिसुन येते.यावेळी हिंगोली जिल्हाप्रमुख संदेश देशमुख,सह संपर्कप्रमुख सुनिल काळे,उप जिल्हाप्रमुख गणेश शिंदे,अनिल कदम,माजी सरपंच रामगोपाल भाऊ गट्टाणी,दिलीपराव देशमुख,माजी कृ.उ.बा.समिती संचालक नारायण झाडे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## हिवताप निर्मूलनासाठी नागरिकांचा सहभाग महत्वाचा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

राष्ट्रीय हिवताप निर्मूलनासाठी उपचाराबरोबर प्रतिबंध महत्त्वाचा आहे. त्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. या आजाराच्या प्रतिबंधासाठी परिसर स्वच्छ राखणे आवश्यक असल्याने नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. गणेश जोगदंड यांनी केले आहे.

राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस जागतिक हिवताप दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याच पार्श्वभूमीवर हिवताप आजाराविषयी जनतेमध्ये जनजागृती निर्माण होऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना व अंमलबजावणीमध्ये सक्रिय सहभाग करून घेण्यासाठी हिवताप जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. हिवताप हा किटकजन्य आजार असून अनेक आजारांपैकी एक गंभीर आजार आहे. गर्भवती महिला व बालकांना हिवतापापासून सर्वाधिक धोका संभवतो वेळीच उपचार घ्यावा. कीटकनाशक, आळी नाशकाची, डासोउत्पत्तीस्थानामध्ये डासअळी भक्षक गप्पी मासे सोडणे, डासांचा उपद्रव पूर्णपणे टाळण्यासाठी पाण्याच्या सर्व टाक्या तसेच पिंप साठे व्यवस्थित झाकून ठेवावे, इमारतीच्या गच्चीवर आणि परिसरात अनावश्यक पाणी साचू देऊ नये, वैयक्तिक सुरक्षतेसाठी मच्छरदाणीचा वापर करावा, डास प्रतिबंधक यंत्रे, मलम, अगरबत्तीचा वापर, घरांच्या खिडक्यांना बारीक जाळीचे पडदे लावणे, घराच्या सभोवतालील परिसरामध्ये पाण्याची डबके साचू देऊ नये. ते वाहते करावी किंवा त्यामध्ये जळके ऑइल किंवा रॉकेल टाकावे, नारळाच्या करवंट्या, टायर्स, फुलदाण्या, कुलर्स यामध्ये पाणी साचू देऊ नये.

आठवड्यातून एक दिवस शनिवार हा कोरडा दिवस म्हणून पाळण्यात यावा. या दिवशी आपल्या घरातील सर्व पाणी साठा स्वच्छ पुसून कोरडे करून त्यामध्ये पाणी भरावे. जेणेकरून डासांची उत्पत्ती होणार नाही याकडे सर्वांनी लक्ष द्यावे आणि हिवताप, डेंगू आजार टाळावा, असे आवाहनही जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. गणेश जोगदंड यांनी केले आहे.

## स्वर्गीय सुधाकर पाईकराव यांच्या प्रित्यार्थ सम्यक बुद्ध विहाराला चपाती तावा भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**



शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्ड मधील सम्यक बुद्ध विहाराला स्वर्गीय सुधाकर पाईकराव यांच्या प्रित्यार्थ उपासक उमेश सुधाकर पाईकराव यांच्या कडून सम्यक बुद्ध विहाराला चपाती तावा सप्रेम भेट देण्यात आला.व तो रमामाता महिला मंडळ यांनी स्विकार करून उमेश पाईकराव व त्यांची पत्नी सौ. प्रेरणा पाईकराव यांचा रमामाचा महिला मंडळ अध्यक्ष उषाताई इंगोले यांच्या सह सर्व पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छा व शाल देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी रमामाता महिला मंडळाच्या अध्यक्षा उषाताई इंगोले, भारतीताई केंद्रेकर उपाध्यक्षा, सुनिता दिवेकर कोषाध्यक्ष, कांचन दिवेकर, उज्वला धबाले, राखी धबाले सचिव, स्वाती दिवेकर संघटक, विद्या इंगोले, मिराबाई दिवेकर, सुभद्राबाई पाईकराव, शारदा बहादुरे, पत्रकार सिद्धार्थ दिवेकर, तुषार पाईकराव, दिपक इंगोले इत्यादी अनेक उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आचार्यश्री महाश्रमणजींचे शतकमहोत्सवी वर्षात अमोलक विद्यालयात भव्य स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**





धर्मपरायण जैन श्वेतांबर तेरापंथ धर्मसंघाचे अकरावे आचार्य महातपस्वी श्री महाश्रमण यांच्या पदयात्रेचे गुरुवार दि. १८ एप्रिल २०२४ सकाळी ९ वा. श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळामध्ये आगमन झाले. आचार्य श्री महाश्रमण यांच्यासोबत १०० साधू-साध्वी पदयात्रेमध्ये सहभागी असून या पदयात्रेचे कडा येथील जैन समाज तसेच अमोलक परिवाराकडून मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

आचार्य श्री महाश्रमण यांनी मार्गदर्शन करताना असे सांगितले कि, शास्त्र सांगते की श्रवणाने मनुष्याला कल्याण कळते आणि श्रवणाने त्याला पापही कळते. सध्या अत्याधुनिक उपकरणांमधून अनेक माध्यमांतून ऐकून ज्ञान संपादन केले जाऊ शकते.आज डिजिटल युगात युट्युबच्या माध्यमातून घरबसल्या प्रवचन पाहता- ऐकता येते. कान श्रवणासाठी उपयुक्त आहेत आणि ऐकणे हे ज्ञान वाढवण्याचे माध्यम आहे. ऐकणे इतके महत्त्वाचे असेल तर माणसाने चांगले ऐकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. साधू-संतांची प्रवचने ऐकल्याने लाभ होऊ शकतो. शैक्षणिक संस्थांनी शारीरिक शिक्षणासह अध्यात्माचे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे प्रधानमंत्री श्री हेमंत पोखरणा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की संस्थेला जैन श्वेतांबर साधू-संतांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन वेळोवेळी मिळत असते. त्यांच्या मार्गदर्शनानुसार संस्था आपले कार्य करत आहे तसेच संस्थेचा इतिहास आणि आगामी दहा वर्षांमध्ये राबविल्या जाणाऱ्या भविष्यातील योजनांविषयी विस्तृत माहिती दिली.आचार्यश्रींच्या स्वागत मिरवणुकीत सर्वधर्मीय नागरिक, शाळकरी मुले, एन.सी.सी.कॅडेट्स तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.जैन समाजातील लोकांच्या विनंतीवरून आचार्यश्रींनी स्थानिक जैन स्थानकालाही भेट दिली.श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सकाळी आचार्यश्रींच्या स्वागतासाठी नवकार महामंत्र तसेच प्रार्थना सादर केली. स्थानिक महिलांनी स्वागत गीत गायन केले आणि बाईक रॅली आयोजित केली.डी.फार्मसी आणि बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे सादरीकरण केले. सृष्टी दळवी या लहान मुलीने आपले मनोगत व्यक्त केले.दरम्यान मा.मंत्री पंकजाताई मुंढे, मा.राज्य मंत्री सुरेश अण्णा धास यांनीही आचार्य श्री महाश्रमण यांचे आशीर्वाद घेतले.कडा परिसरातील नागरिकांना इतक्या मोठ्या संख्येने साधु- साधविंच्या दर्शनाचा लाभ मिळाला. आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या दर्शनासाठी गुजरात, राजस्थान, तामिळनाडू तसेच विविध राज्यातील भाविकांनी गर्दी केली होती, भाविकांना दर्शनासह अनमोल मार्गदर्शनासाठीची विशेष व्यवस्था श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळातर्फे करण्यात आलेली होती.

आचार्य श्री महाश्रमणजी यांनी सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिर आयोजित करुन अनमोल मार्गदर्शन केले.आचार्य श्री महाश्रमणजींनी आत्मकल्याणासह, लोककल्याण आणि परोपकार यावर विशेष भर देत अहिंसा यात्रेच्या माध्यमातून नैतिकता, प्रामाणिकता, अहिंसा,सदाचार आणि नशामुक्तीची प्रेरणा दिली.आचार्य महाश्रमण यांच्या मार्गदर्शनाचा सर्व धर्मीय नागरिक आणि विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. आचार्य श्री महाश्रमणजी यांनी अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाविषयी गौरवोद्गार काढले. श्री नहार साहेब यांच्याकडून अमोलक संस्थेतील सर्व विभाग प्रमुखांचा सत्कार करण्यात आला.श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळामध्ये शालेय शिक्षण घेऊन नुकतेच एम.बी.बी.एस. ही पदवी मिळविलेल्या १२ विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार आचार्यश्री महाश्रमणजी यांच्या उपस्थितीत करण्यात आला. तसेच संस्थेतील काही कर्मचाऱ्यांचा विशेष कामगिरीबद्दल सन्मान केला गेला.

निलेश नंदलाल मुनोत हा यूपीएससी आणि सुनील गोरख गायकवाड हा एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचाही पालकांसह सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी ग्राम पंचायत कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती,पोलीस प्रशासन,भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेही विशेष सहकार्य मिळाले. या कार्यक्रम प्रसंगी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष योगेश भंडारी, कार्याध्यक्ष कांतीलाल चानोदिया,ट्रस्ट अध्यक्ष गोकुळदास मेहर, उपाध्यक्ष अनिल झाडमुथा, बिपिन भंडारी,प्रधानमंत्री हेमंत पोखरणा,मानदमंत्री विनोद बलदोटा, मानदमंत्री डॉ. महेंद्र पटवा कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी,तसेच संचालक रमेश गुगळे,संजय मेहेर,प्रफुल्ल पोखरणा, योगेश चानोदिया,श्री संजय कोठारी, श्री संतोष भंडारी, संतोष गांधी, अनिल मेहर, संजय भंडारी, अजय चोरबेले,डॉ. प्रमोद भळगट, ललित कटारिया, संतोष शिंगवी, दिलीप पटवा,पोपट भळगट, जैन श्रावक संघाचे अध्यक्ष रतीलाल कटारिया, कोषाध्यक्ष शिंगवी सर, डॉ.अशोक गांधी, निलेश गांधी, संदीप भळगट, सुशील पटवा,शैलेश गांधी, संजय मेहेर, सुखलाल मुथा, बहु मंडळ,कन्या मंडळ,युवक मंडळ, सकल जैन संघाचे सदस्य, इत्यादी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.जवाहरलाल भंडारी, नवनाथ पडोळे,डॉ.एन. एस.राठी,मथाजी शिकरे,प्रकाश सरडे, महेश म्हस्के, डॉ.गफ्फार सय्यद, धनंजय कोकणे, विठ्ठल पालवे, दत्तात्रय सरोदे, सोभाचंद ललवाणी, मोहसिन पठाण, अजित गुगळे,सुप्रिया महामुनी, शिंदे मॅडम,श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ तसेच श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ आणि अमोलक परिवारातील सर्व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. जवाहरलाल भंडारी यांनी केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904